स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 31/07/2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 2. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. संजय काकडे, उपायुक्त
2. श्री. प्रमोद भुसारी, अति. उपायुक्त

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 133:– मा. उच्च न्यायालयाने आदेशीत केलयाप्रमाणे नागपूर शहरातील रस्त्यावर चालणाऱ्या, गर्दीच्या व बाजारपेठा इत्यादी ठिकाणी कामास्तव येणाऱ्या महिलांसाठी रस्त्यांच्या लगत महिला प्रसाधनगृहे उभारण्याच्या कामामध्ये, स्वयंसेवी संस्था "रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य" यांनी स्वखर्चाने मनपा हद्दीत खालील चार स्थळे

1) व्हेरायटी चौक, ईटरनिटी मॉल समोर, फुटपाथवरील पार्किंगच्या जागेत, गठई दुकानाच्या बाजूला
2) वर्धा रोड, पंचशील चौक–धिरन कन्या शाळेलगतच्या फुटपाथवर
3) इतवारी– नंगा पुतळा जवळ, पोलिस क्वार्टरच्या बाजूला

4) गोकुलपेठ मार्केट परिसरात– हरणे महिला इमारतीच्या जवळील फुटपाथ या ठिकाणी उभारण्याकरीता दाखविलेले स्वारस्य विचारात घेता त्यांना याची परवानगी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन जाहिरातीचे अधिकार म.न.पा.चे राहील या अटीवर व सुविधा निःशुल्क राहील या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 134:— नागपूर शहरातील पार्किंग व वाहतुकीच्या कोंडी अंतर्गत अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना करण्याकरीता एक तांत्रिक सल्लागार M/s. Uraban Mass Transit Company Ltd (UMTC), Gurgaon, Haryana. यांची नियुक्ती त्यांनी सादर केलेल्या वित्तीय ऑफर रू. ६०,१८,८००/— (सर्व्हीस टॅक्स अतिरिक्त) मध्ये Short term Traffic Improvement Plan (STTIMT) & Parking Policy & Parking Master Plan बदद्ल धोरण तयार करवून घेण्याकरीता मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 135:— नागपूर महानगरपालिकेतील विविध विभागातील संगणकीय कामासाठी विभागांना लागणारे अतिरिक्त 21 संगणक ऑपरेटर्स बाबत.

नागपूर महानगरपालिकेतील 100 संगणक ऑपरेटर्स पुरविण्यासाठी स्थायी समितीकडून ठराव क्रं. 537 दि. 07/02/2015 अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे व कार्यादेश क्रं. NMC/GAD/CFC/14-15/W.O./25-02/01, दि. 25/02/2015 अन्वये विविध विभागात कार्यरत आहेत. परंतु नागपूर महानगरपालिकेतील ईतर विभागातसुध्दा अतिरिक्त संगणक ऑपरेटर्सची मागणी असल्यामुळे दि. 17 मार्च 2015 ते 31 मार्च 2015 पर्यंत 31 संगणक ऑपरेटर्ससाठी मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केली होती. या 31 ऑपरेटर्सपैकी मालमत्ता कर विभागाने 10 संगणक ऑपरेटर्स फक्त 31 मार्च 2015 पर्यंत मागितले असल्यामुळे, दि. 1 एप्रिल 2015 पासून दि. 30 जून 2015 पर्यंत 21 संगणक ऑपरेटर्स कार्यरत होते.. या विभागांना 30 जून 2015 पर्यंत संगणक ऑपरेटर्सची पर्यायी व्यवस्था करण्यासबंधी कळविण्यात आले होते. परंतु पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे 21 संगणक ऑपरेटर्सना मुदतवाढ देणेबाबत संबधीत विभागाकडून विनंती प्राप्त झाली होती.

विभागांची विनंती लक्षात घेता व पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे दि. 31 जुलै 2015 पर्यंत 21 संगणक ऑपरेटर्सना मुदतवाढ देणेबाबतच्या विनंतीस मंजुरी दिलेली आहे.

(अ) सबब या 21 संगणक ऑपरेटर्सना (100+21=121) ठराव क्रं. 537 दि. 07/02/2015 अन्वये मंजुर केलेल्या दरानुसार मुळ कंत्राटाच्या कालावधीपर्यंत, कंत्राटाचे दर, अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन फेब्रुवारी 2016 पर्यंत मुदतवाढीस प्रस्ताव एकमताने मंजूरी प्रदान केली.

(ब) तसेच वेळोवेळी विविध कामासाठी अतिरिक्त संगणक ऑपरेटर्स लागण्याची शक्यता असते. त्यामुळे गरजेप्रमाणे वेळोवेळी अतिरिक्त संगणक ऑपरेटर्सना मंजुरी देण्याचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना मंजूरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 136:— नागपूर शहरातील सार्वजनिक शौचालये व मुत्रीघरे (पक्के व फायबर) यांची यांत्रिकी पध्दतीने साफ सफाई करण्यासाठी दोन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्याचा व निविदा प्रक्रीया पुर्ण होईस्तोवर जुन्या मंजूर दरावर काम पूढे सुरू ठेवण्याच्या तसेच या कामावर होणारा वार्षीक अंदाजीत रूपये 2,09,95,260/— पद क्र. A24101231601 मधून व उपलब्ध प्रावधानामधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अ) निविदा पूर्ण होईस्तोवर जुन्या मंजूर दरावर काम पूढे सुरु ठेवण्याचा प्रशासनाचा प्रस्तावात किती खर्च अपेक्षीत आहे व कीती महीन्याची मुदत वाढ आहे. याची कार्यालयाने स्पष्टता केली नाही. त्यामुळे उपरोक्त प्रस्ताव कार्यालयास परत करण्यात येतो. हा प्रस्ताव विस्तृत पध्दतीने, प्रस्तावित करुन कार्यालयास स्थायी समिती कडुन काय अपेक्षीत आहे ? असा स्वतंत्र प्रस्ताव स्थायी समितीकडे पुन्हा सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ब) रुपये 2,09,95,260/— निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेऊन यांत्रिक पध्दतीने साफ सफाई करण्यास लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह प्रस्तावित निविदा काढण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 137</u>:— म.न.पा. मालकीचे टक्कामोरे मार्केट, सतरंजीपुरा झोन क्र. 7 कार्यक्षेत्रातील दुसऱ्या माळ्यावर असलेले 73.84 चौ.मी. क्षेत्रफळाचे टिनाचे शेड/हॉल बऱ्याच वर्षापुर्वी गांधीबाग झोन क्र. 6 व्दारा बांधण्यात आलेला आहे. सदरहु शेड/हॉल रिकामा आहे. सदरहु शेड/हॉल चा वापर करणेकरीता तिन अर्जदारांनी अर्ज सादर करून मागणी केलेली आहे. तिन अर्जदारा पैकी श्री. नरेंद्र नथ्थुजी कर्णेवार, हे टक्कामोरे मार्केट येथील एका दुकानाचे परवानेधारक आहेत. संबंधीत सदरहु हॉल/शेड करीता म.न.पा. ठरविल त्या दरानुसार व अटि व शर्ती नुसार शेड/हॉल वापराकरीता देण्याची मागणी केलेली आहे. उर्वरीत दोन अर्जदार शासकीय जनसमस्या मुक्ती कॉग्रेस व क्रांतीसुर्य संघटन यांनी निशुल्क भाडे तत्वावर शेड/हॉल ची मागणी केलेली आहे.

मा. श्री. दिपक मोहन पटेल, नगरसेवक, प्रभाग क्र. 27 (अ) व सदस्य स्थायी समिती, यांनी दि. 15/04/2015 ला मा. अध्यक्ष, स्थायी समिती, म.न.पा. यांना पत्र देवुन नियमानुसार संबंधीत अर्जदार श्री. नरेंद्र नथ्थुजी कर्णेवार, यांना भाड्याने सदरहु हॉल/शेड देण्याची शिफारस केलेली आहे. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, म.न.पा. यांनी सदरहु शिफारस पत्रावर योग्य प्रस्ताव स्थायी समिती समोर त्वरीत सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. ह्या अनुषंगाने बाजार विभाग, म.न.पा. व्दारा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 1949 चे कलम **कलम 332 (क)** अन्वये मा. आयुक्त, महानगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु–आवारातील कोणत्याही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याचा विशेषाधिकार, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीसाठी आणि अशा शर्तीवर जाहीर लिलावाने किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगीरीत्या विक्री करून विनियोग करू शकतील. तशी तरतुद आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 1949 चे **कलम 79 (ड)** अन्वये मा. आयुक्त, महानगरपालिकंच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता चालु बाजार किंमती पेक्षा कमी असणार नाही असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला आकारून मालमत्तेचा विनियोग करू शकेल, अशी तरतुद आहे.

टक्कामोरे मार्केट, येथील गाळे यापुर्वी अग्रिम जमा राशी योजनेच्या तहत आवंटन करण्यात आलेले आहे. म्हणुन सदरहु प्रकरणात देखील अर्जदाराकडुन अग्रीम जमा राशी प्राप्त करून घेण्याबाबत विचार करावा लागेल.

टक्कामोरे मार्केट, मधील सदरहु शेड/हॉल चे क्षेत्रफळ 73.84 चौ.मी. असुन नगर रचना विभाग, म.न.पा. यांनी त्याकरीता भाडे रू. 26,582/— प्रति महिना मुल्यांकीत केलेले आहे.

उपरोक्त तरतुदिंचा वापर करून व म.न.पा. आर्थीक हित जोपासुन टक्कामोरे मार्केट, येथील 73.84 चौ.मी. क्षेत्रफळाचा हॉल/शेड चा वापर करणेकरीता जो अर्जदार आजच्या बाजार मुल्य व भाडे पेक्षा कमी असणार नाही अशा बाजार मुल्य व भाडे मुल्यावर अग्रिम जमा योजने अंतर्गत वापराकरीता घेणेस तयार असेल अशा अर्जदाराच्या मागणीबाबत निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने ज्या बाजार मुल्यांवर व भाडे मुल्य प्रस्तावित केले आहे, त्यावर स्थायी समितीने असमाधान व्यक्त केले आहे.

प्रस्तावित विषयातील म.न.पा. मालकीचे मार्केट असुन ते 1980 मध्ये बांधण्यात आले असे कार्यालयाने स्पष्ट केले, त्यामुळे सिध्दशीघ्र गणका प्रमाणे विभागाने जे मुल्यांकन केले आहे, ते इमारतीच्या मुल्यांकनाचा जो घसारा काढला आहे. तो तर्कसंगत नाही, असे स्थायी समितीचे मत आहे.

करीता विषय कार्यालयास परत करण्यात येतो. योग्य मुल्यांकनासह प्रस्ताव परत स्थायी समितीकडे सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 138</u>:— ई—गर्व्हनंस प्रणाली अंतर्गत ऑन लाईन पेमेंट साठी पेमेंट गेट वे सुविधा Commercial offer for tender, Enhancing Customer Convenience by Managing Payment Processing Technology and operation with online Payment (Providing Payment Gateway) for e-Governance System of Nagpur Municipal Corporation ( NMC), Nagpur उपलब्ध करून देण्यास्तव निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मे. इंडीया आयडीयाज डॉट कॉम (Billdesk) व मे. एच.डी.एफ.सी. बॅक यांचेकडील दोन निविदा प्राप्त झाल्या. मे. एच.डी.एफ. सी. बॅक यांचे दर निम्नतम असून पुढील प्रमाणे आहेत व मे. इंडीया आयडीयाज डॉट कॉम (Billdesk) यांनी या निम्नतम दरावर सुविधा देण्याची तयारी दर्शवली आहे.

| | प्रस्तावित दर | | | आधीचे मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| **Service** | **Integration Fee(Rs)** | **Transaction fee (Rs. Per transaction /percentage)** | | |
| A. Payment gateway | | | | |
| -online real time Property Tax Payment and other payment using -Net Banking/Credit card/Cash card | **No Charges** | **Net Banking** | **Rs. NIL per transaction** | **Rs. 5 per transaction** |
| | | **Credit card** | | |
| | | **Visa** | **1% on transaction amount** | **1.8 % on transaction amount** |
| | | **Master** | **1 % on transaction amount** | **1.8 % on transaction amount** |
| | | **Dinners** | **1% on transaction amount** | **3 % on transaction amount** |
| | | **American Express** | **1 % on transaction amount** | **3.5 % on transaction amount** |
| B. Online EBPP Service | **No Charges** | **Net Banking** | **Rs…NIL.per transaction** | **Rs.5 per transaction** |
| online service for customers to view and pay NMC bills using any bank account with new bill alerts, due date reminders and Payment confirmation by email. - - | | **Credit card** | | |
| | | **Visa** | **1 % on transaction amount** | **1.8 % on transaction amount** |
| | | **Master** | **1 % on transaction amount** | **1.8 % on transaction amount** |
| | | **Dinners** | **1 % on transaction amount** | **3 % on transaction amount** |
| | | **American Express** | **1 % on transaction amount** | **3.5 % on transaction amount** |
| | प्रस्तावित दर | | | आधीचे मंजूर दर |
| **Service** | **Integration Fee(Rs)** | **Transaction fee (Rs. Per transaction /percentage)** | | |
| C. All other Payment Modes | **No Charges** | **Bank Account Debit** | **Rs Nil. per transaction** | **Rs 5. per transaction** |
| standing instructions-Bank account (Partner Bank Channel)/Credit Card | | **Credit card** | **1 % on transaction amount** | **1.5 % on transaction amount subject to a min of Rs.6** |
| | | **Debit Card** | **0.75 % on transaction amount below Rs.2000. 1 % on transaction amount below Rs.2000.** | सुविधा उपलब्ध नव्हती. |
| D. Any other payment options | | | | |
| Wallet/ Prepaid card based Payment Facility | **No Charges** | | **2.25 % on transaction amount** | सुविधा उपलब्ध नव्हती. |
| Mobile App based payments | | **Credit Debit** | **1% per transaction** | सुविधा उपलब्ध नव्हती. |
| | | **Cash Card & Debit card** | **0.75 % on transaction amount below Rs.2000. 1 % on transaction amount below Rs.2000.** | सुविधा उपलब्ध नव्हती. |

त्यामूळे उपरोक्त प्रस्तावित दर मंजूर करून मे. इंडीया आयडीयाज डॉट कॉम (Billdesk) व मे. एच.डी.एफ.सी. बॅक या दोन्ही एजंसीव्दारे या दरांवर पेमेंट गेट वे सेवा–सुविधा नागरीकांना उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या निविदा प्रक्रीयेत एल–1 M/s एच.डी.एफ.सी. बॅक यांची निविदा एकमताने मंजूर, मे. इंडीया आयडीयाज डॉट कॉम यांनी एल–1 च्या निम्नतम दरावर सुविधा देण्याची तयार दर्शवली असली तरी ते नियमाप्रमाणे नाही. त्यामुळे कार्यालयाचा हा प्रस्ताव समितीने एकमताने नामंजूर करते.

**ठराव क्रमांक 139** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

उपनिगम आयुक्त
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर